Belapur Education Society's

## ARTS AND COMMERCE COLLEGE BELAPUR

Tai-Shrirampur, Dist-Ahemadnagar

# Karate Training Course 2021-22










## बेलापूर महाविद्यालयात विद्यार्थींनींना मोफत कराटे प्रशिक्षण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** येथील महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थ्यीनींसाठी (दि.१ ते ३० एप्रिल २०२२) पर्यंत सकाळी १०:३० ते ११:३० या वेळेत मोफत कराटे प्रशिक्षण सुरु करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. गुंफा कोकाटे यांनी दिली. कराटे प्रशिक्षणाचे समन्वयक प्रा.विनायक काळे, प्रशिक्षणाचे प्रशिक्षक तज्ज्ञ अकबर शेख हे काम करणार आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी निर्भय बनून स्वत:चे संरक्षण करावे, स्वत:तील आत्मबल जागे करुन सामाजिक व शैक्षणिक विकास करावा, असे आवाहन महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन राजेश खटोड, भरत साळुंके, रविंद्र खटोड, राजेंद्र सिकची, सुविद्या सोमाणी, अ‍ॅड.विजय साळुंके, प्रा.हंबीरराव नाईक यांनी केले आहे. ज्या विद्यार्थिनी प्रशिक्षणासाठी दररोज नियमितपणे उपस्थित राहतील, त्यांनाच प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहे.

**Belapur Education Society's**

**ARTS AND COMMERCE COLLEGE BELAPUR**

**Tai-Shrirampur, Dist-Ahemadnagar**

# Soft Skill Development Course 2021-22












## कौशल्यावर आधारित शिक्षण हीच खरी काळाची गरज आहे - राजेंद्र डांगी

बेलापूर : कौशल्यावर आधारित शिक्षण हीच काळाची गरज आहे असे प्रतिपादन बेलापूर येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य शाखेसाठी शॉर्ट टर्म स्कील कोर्सच्या नव्या संधी या विषयावर बोलताना पुणे येथिल आईज इन्स्टिट्यूट ऑफ अकाउंट्स अँण्ड टॅक्सेशनचे राजेंद्र डांगी यांनी केले.

ते पुढे असेही म्हणाले की, भारतात कौशल्य शिक्षण हे व्यावसायिक शिक्षण कौशल्य मानले जाते, जे अल्पमुदतीचे प्रशिक्षण असते. कुशल व्यक्ती, कुशल व्यवसायिकांची मागणी खूप जास्त आहे. महाविद्यालयीन शिक्षणासोबत कौशल्यावर आधारित शिक्षणावर अधिक भर दिला पाहिजे. या एकविसाव्या शतकात शिक्षण महत्वाचे असले तरी कौशल्य हे सर्वात महत्वाचे आहे कारण त्याचा मानवी जीवनावर सकारात्मक परिणाम होतो. कौशल्यावर आधारित शिक्षण ही काळाची गरज आहे .सध्याच्या महामारीने स्थानिक उत्पादनाचा वापर वाढला आहे आणि लोकांना कौशल्य चालित समाजाचे महत्व ओळखण्यास मदत झाली आहे . कौशल्यावर आधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षितता,व्यावसायिक व शैक्षणिक लाभ मिळू शकतात कारण ते औपचारिक व अनौपचारिक असे लाभ असतात. कौशल्यावर आधारीत शिक्षण हे दोन्ही प्रकारच्या शिक्षणाची सम तुल्य पावती प्रदान करते .विद्यार्थी हे देशाचे मानवी भांडवल असून अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांना सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी शॉर्ट स्किल कोर्स अत्यावश्यक आहेत असेही ते म्हणाले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.गुंफा कोकाटे होत्या. कार्यक्रमाचे संयोजन व सुत्रसंचालन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.प्रकाश देशपांडे, करिअर प्लेसमेंटचे डॉ.अशोक माने, डॉ भाऊसाहेब पवार यांनी केले. या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## .आशुतोष काळे

मदत होवून त्यातून वाचणारी रक्कम इतर सोयीसुविधांसाठी वापरली जाईल. यासाठी तहसील कार्यालय व पंचायत समितीवर इमारतीवर सोलर प्लॅन्ट बसवावे अशी मागणी ना. आशुतोष काळे यांनी निवेदनाच्या माध्यमातून पालकमंत्री ना. हसन मुश्रीफ यांच्याकडे केली आहे. याबाबत पालकमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे ना. आशुतोष काळे यांनी सांगितले आहे.